MHPU260001342012

| | |
|---|---|
| दाखल दिनांक | १९/०१/२०१२ |
| नोंदणी दिनांक | १९/०१/२०१२ |
| निकाल दिनांक | २३/०१/२०२६ |
| कालावधी | १४ वर्ष ०० महिने ०४ दिवस |

**(भाग – अ)**

**मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वडगाव मावळ यांचे न्यायालयात,**

**(पिठासीन अधिकारी श्रीमती एस.ए.माळी)**

**संक्षिप्त फौजदारी खटलाः ८८/२०१२**

**प्रस्तुतचा खटला हा वॉरंट खटल्याप्रमाणे चालवण्यात आला.**

**निशाणी क्रमांक**

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | – | महाराष्ट्र शासन<br>तर्फे देहुरोड पोलीस स्टेशन,<br>गुन्हा र.नं. २३१/२०११<br>तालुका– मावळ, जिल्हा– पुणे |
| **अभियोग पक्षातर्फे** | – | सहाय्यक सरकारी अभियोक्ता<br>श्रीमती मोहोळ. |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| **आरोपी** | – | महमद रफिक शेख,<br>वयः ५६ वर्षे, व्यवसायः ड्रायव्हर,<br>रा. ८१, ७ क्रॉस, डेअरी सर्कल जवळ,<br>एस. आर. नगारा, बेंग्लोर साउथ,<br>कर्नाटक. |
| **आरोपीतर्फे विद्वान वकील** | – | श्री. ए. बी. शिंदे. |

## (भाग – ब)

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | दि. २९/०६/२०११ |
| फिर्याद दिल्याची तारीख | दि. २९/०६/२०११ |
| दोषारोप पत्र दाखल केल्याची तारीख | दि. १९/०१/२०१२ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | दि. २५/०२/२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण ठेवल्याची तारीख | दि. २३/०१/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | दि. २३/०१/२०२६ |
| आरोपीला शिक्षा ठोठावली असेल तर त्याची तारीख | निरंक |

## (आरोपीचा तपशील)

| आरोपीचा अ.क्र. | आरोपीचे नावे | अटक तारीख | जामिनावर सोडल्याची तारीख | आरोपीवर ठेवलेले दोषारोप | आरोपीना निर्दोष किंवा दोषी ठरवलेली तारीख | शिक्षा लादलेली असल्यास | शिक्षा वजा वट केल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | महमद रफिक शेख | ०२.०७.२०११ | ०२.०७.२०११ | भा.दं. वि. संहिता कलम ३०४–अ, ३३८ आणि मोटर वाहन कायदा कलम १८४ अन्वये | २३/०१/२०२६ | निरंक | निरंक |

## (भाग – क)

## (अभियोग पक्षातर्फे साक्षीदारांची यादी)

| साक्षीदारांचे अनु. क्र. | नाव | निशाणी क्र. | पुराव्याचा तपशील |
|---|---|---|---|
| १. | डी. एस. वंजारी | ३० | तपासी अधिकारी |

**आरोपीतर्फे तोंडी पुरावा देण्यात आलेला नाही.**

(अभियोग पक्षातर्फे / आरोपीतर्फे पुरावा निशाणी क्रमांक यादी)

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १ | मरणोत्तर पंचनामा | ३१ |
| २ | फिर्याद | ३२ |
| ३ | छापील फिर्याद | ३३ |
| ४ | घटनास्थळ पंचनामा | ३४ |
| ५ | वाहनांचे तपासणीकरीता पाठविलेले पत्र | ३५ |
| ६ | अटक फॉर्म | ३६ |

आरोपीतर्फे लेखी पुरावा देण्यात आलेला नाही.

## न्यायनिर्णय

## (पारीत केल्याची तारीख २३/०१/२०२६)

आरोपीवर भारतीय दंड विधान संहिता (सोईकरीता भा.दं.वि. असे संबोधण्यात येत आहे) कलम ३०४–अ, ३३८ आणि मोटर वाहन कायदा कलम १८४ (सोईकरीता मो.वा. का. असे संबोधण्यात येत आहे) अन्वये दोषारोप ठेवण्यात आलेला आहे.

**अभियोग पक्षाची संक्षिप्त हकिकत येणेप्रमाणेः**

२. दि. २९/०६/२०११ रोजी ०२.३० वाजताच्या सुमारास मौजे किवळे, मुंबई पुणे हायवे रोडवर आरोपीने त्याचे ताब्यातील ट्रक नं. के.ए. ०१ डी. ६२३३ हा अविचाराने,

निष्काळजीपणे, भरधाव वेगाने चालवून व रस्त्याचे परिस्थीकडे दुर्लक्ष करुन रस्त्याचे कडेला पंक्चर झालेला उभा असलेला ट्रक क्र. के. ए. २८ए/७३६६ यास पाठीमागून ठोस देवून पंक्चर झालेला चाक बदलीत असलेला इसम नामे गलिबसाब मेहबुसाब अलमेल यांस किरकोळ व गंभीर जखमी करुन त्यांच्या मृत्यू झाला व फिर्यादीचे उजवे पायाचे बोट फ्रॉक्चर करणेस कारणीभुत झाला व वाहनांचे नुकसान केले. अशा मजकुराची फिर्याद देण्यात आली.

३. वर नमुद मजकुराची फिर्याद फिर्यादीने देहुरोड पोलीस स्टेशनला दिली. त्यानुसार, गुन्हा रजिस्टर क्र. २३१/२०११ ची नोंद होऊन भारतीय दंड विधान संहितेचे कलम २७९, ३०४-अ, ३३७, ३३८, ४२७, ३३७, ३३८ व मोटर वाहन कायद्याचे कलम १८४ अन्वये नोंदविण्यात आला. तपासी अमंलदार यांनी घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे बयान त्यांच्या सांगण्याप्रमाणे घेतले. तपासाअंती पोलीस ठाणे अंमलदार यांनी आरोपीविरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

४. माझे पुर्वाधिकारी यांनी आरोपीविरुध्द निशाणी क्र. ११ वर दोषारोप निश्चित केले. त्यातील माहिती त्यांना मराठी भाषेत समजावून सांगितली. ती त्यांना समजल्यानंतर त्यांची जबानी नोंदविण्यात आली. आरोपीने त्यांच्या विरुध्द निश्चित केलेले दोषारोप नाकारले व संपरिक्षेची मागणी केली.

५. आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ३५१ अन्वये निवेदन निशाणी ३९ अन्वये नोंदविण्यात आले.

६. अभियोगपक्षाकरीता सरकारी अभियोक्ता श्रीमती मोहोळ व आरोपीचे विद्वान विधीज्ञ श्री. ए. बी. शिंदे यांचा युक्तिवाद ऐकला.

७. अभियोग पक्षाच्या कथेवरुन माझ्यासमोर खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले व त्यावर मी पुढीलप्रमाणे कारणांसहीत निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय की, दि. २९/०६/२०११ रोजी ०२.३० वाजताच्या सुमारास मौजे किवळे, मुंबई पुणे हायवे रोडवर, ता. मावळ, पुणे आरोपीने त्यांच्या ताब्यातील ट्रक नं. के. ए. ०१ डी ६२३३ हे भरधाव व निष्काळजीपणे चालवून गलिबसाब मेहबुसाब अलमेल यांचा अपघात केला त्यांचा मृत्यू होण्यास कारणीभूत झाला व त्याद्वारे त्याने भारतीय दंड विधान संहिता कलम ३०४– अ अन्वये गुन्हा केला ? | **नकारार्थी** |
| २. | अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय की, वरील तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमुद वाहन बेदरकारपणे व निष्काळजीपणे चालविले व त्यामुळे फिर्यादी यांना गंभीर जखमी केले व त्यायोगे त्याने भारतीय दंड विधान संहिता कलम ३३८ प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केला ? | **नकारार्थी** |
| ३. | अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय की, वरील तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने जागेच्या परिस्थितीचा विचार न करता जनतेला धोकादायक ठरेल अशा वेगाने किंवा रितीने वाहन चालविले व त्याने मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केला ? | **नकारार्थी** |
| ४. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ३ करीता**

८. मुद्दा क्र.१ ते ३ हे आपसात निगडीत असल्यामुळे त्यांचा एकत्रीतरित्या विचार

करण्यात आला. डी. एस. वंजारी (अ.सा.क्र. १) यांच्या सरतपासात असे आले आहे की, सन २०११ मध्ये ते देहूरोड पोलीस स्टेशन येथे पोलीस हेड कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत होते. त्यावेळी साई ज्योती हॉस्पीटलमधून डॉक्टर थोरात यांनी अपघातामध्ये एक इसम मयत झाल्याची खबर दिली. त्यानंतर हॉस्पीटलमध्ये जाउन बॉडी पी एम साठी वाय सी एम हॉस्पीटलमध्ये नेण्यात आली. त्याप्रमाणे मरणोत्तर पंचनामा, शवतपासणी अहवाल व ॲडव्हांस सर्टीफिकेट व पी एम नोट्स प्राप्त केले. त्यानंतर मयताच्या मुलगा अल्लाबक्श अलमेल याने फिर्याद दाखल केली. सदरचा अपघात दि. २९/०६/२०११ रोजी रात्री ००.३० वा च्या सुमारास मुंबई पुणे एक्सप्रेस हायवेवर किमी ९२जवळ सदरचा अपघात झालेला होता. सदरचा अपघात आरोपीच्या ट्रक नं. के ए ०१ डी ६२३३ ने फिर्यादी यांच्या ट्रक नं. के ए २८ ए ७३६६ ला पाठीमागून धडक देवून झालेला होता. त्यावरील चालक यास छातीला जाक लागून गंभीर जखम झाल्यामुळे मयत झालेला आहे. सदर फिर्यादीप्रमाणे सी आर नं. २३१/२०११ ची नोंद करण्यात आली.

९. डी. एस. वंजारी (अ.सा.क्र. १) यांच्या उलटतपासात असे आले आहे की, ते घटनास्थळी गेले तेव्हा त्यांच्यासोबत पोलिस कॉन्स्टेबल खाडे बक्कल न. १२६१ हे होते. त्यांच्याव्यतिरीक्त त्यांच्या सोबत दोन पंच होते. ते घटनास्थळी गेले तेव्हा तेथे गाडीचा जॅक होता. घटनास्थळ हे रहदारीचे ठिकाण आहे. या व्यतिरिक्त उलट तपासादरम्यान विचारण्यात आलेल्या इतर प्रश्नांची उत्तरे त्यांनी नाकारलेली आहेत.

१०. दोष सिध्दीसाठी अपघातावेळी आरोपी हा त्याच्या ताब्यातील वाहन मानवी जिवन धोक्यात येईल अथवा व्यक्तीस दुखापत अगर क्षती पोहोचविण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालवित होता, ही बाब संशयापलिकडे शाबीत करण्याची जबाबदारी अभियोगपक्षावर आहे. आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत करण्याकरीता निष्काळजीपणा अथवा हयगय याच बाबी प्रामुख्याने महत्वाच्या आहेत. या अनुषंगाने अभियोग पक्षाच्या पुराव्याचे अवलोकन करणे आवश्यक आहे.

११. प्रस्तुत प्रकरणामध्ये फिर्यादी हे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाहीत. सदर साक्षीदाराने

जरी अपघाताबाबत फिर्याद मधील कथनाप्रमाणे कथन केले असले तरीही त्यांनी त्यांच्या पुराव्यात आरोपी हेच अपघातावेळी गाडी चालवित होते याबाबत कोणतेही कथन केल्याचे दिसुन येत नाही. याव्यतिरीक्त अभियोगपक्षाने पंच साक्षीदार यांची साक्ष नोंदवलेली नाही अथवा कोणत्याही प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराची साक्ष नोंदवलेली नाही. सबब सदर साक्षीदारांची साक्ष आरोपी विरुध्द गुन्हा शाबीत होण्यास अभियोगपक्षास उपयुक्त ठरणार नाही.

**१२.** त्यामुळे अपघातातील वाहन घटनेच्या दिवशी आरोपी हेच चालवित असलेबाबत कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर दिसुन येत नाही. तसेच तपासण्यात आलेले साक्षीदार हे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाहीत. त्यामुळे अभियोगपक्षाने दिलेला पुरावा पाहता सदरचा अपघात हा आरोपीच्या चुकीमुळे झाला असा कोणताही ठोस पुरावा अभियोगपक्षाने याकामी दिलेला नाही. या सर्व परिस्थितीचा विचार करता अभियोगपक्ष वाजवी संशयाच्या पलीकडे जावून दोषारोप शाबीत करण्यात अपयशी ठरला आहे, अशा निष्कर्षास मी येवून पोहोचली आहे. म्हणून मुद्दा क्र.१ ते ३ ची उत्तरे मी नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ करीता</u>**

**१३.** वरील विवेचनावरुन अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द असलेला दोषारोप निःसंशयी शाबीत होईल एवढा पुरावा अभिलेखावर दिलेला नाही. म्हणून आरोपीची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे वरील सर्व बाबींचा विचार करुन मुद्दा क्र. ४ चे उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी महमद रफिक शेख यांची भारतीय दंड विधान संहिता कलम ३०४–अ, ३३८व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये या गुन्हयांच्या आरोपांतून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७१(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे जामीन कदबे रदद करण्यात येतात.

३. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१ अन्वयेच्या तरतुदीनुसार वरिष्ठ न्यायालयात अपिलामध्ये किंवा न्यायनिर्णयाविरुध्द याचिकेमध्ये नोटीस मिळाल्यावर हजर राहण्याकरिता आरोपीने पुढील सहा महिन्यांपर्यंत कायम राहिल असे रुपये १५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र दाखल करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात टंकलिखीत व घोषीत करण्यात आला.)

SAVITA APPASO MALI
Digitally signed by SAVITA APPASO MALI
Date: 2026.01.23 15:45:33 +0530

**(श्रीमती एस.ए.माळी)**

**दिनांकः २३/०१/२०२६** **५वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**

**वडगाव मावळ** **वडगाव मावळ**

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F file Judgment are same word for word as per original order.

| | |
|---|---|
| Name of Stenographer | : D. D. Konde |
| Court Name | : Smt. S. A. Mali, 5th Jt. C.J.J.D. & J.M.F.C. Vadgaon Maval, Pune |
| Date of Judgment/Order | : 23/01/2026 |
| Judgment/Order signed by P.O. on | : 23/01/2026 |
| Judgment/Order uploaded on | : 23/01/2026 |